"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे"

महाराष्ट्र शासन

# उपवनसंरक्षक, यवतमाळ वनविभाग, यवतमाळ यांचे कार्यालय

"वनभवन" प्रशासकिय इमारत, पहिला मजला, चर्च रोड, सिव्हील लाईन, यवतमाळ

दुरध्वनी क्रं.(०७२३२)२४२४५३ Email ID :- dycfyavatmal@mahaforest.gov.in ; dcfyml@gmail.com ISO 9001:2015

**क्रमांक/उवसं.(य)/कक्ष/सर्व्हे / 1608 /२०२२-२३ यवतमाळ दिनांक:- 17/2/2023**

**प्रति,**

**मा.वनसंरक्षक (प्रा.),**

**यवतमाळ.**

**विषय** :- मे.रिलायंन्स जिओ इन्फोकॉम लि.नागपुर यांना जोडमेहा ते नांझा, पोटगव्हाण, डोंगरखर्डा (प्रजिमा-१८)या रस्त्याच्या कडेने ऑप्टीकल फायबर केबल टाकण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यातील ०.०३९ हे. वनजमीन वळती करणेबाबत.

**संदर्भ:** १)मा.अ.प्र.मु.व.स.व केंद्रस्थ अधिकारी म.रा.नागपुर यांचे पत्र क्र./कक्ष-१७/नोडल/य/आयडी-१२९७७/२६९२ दि.१६/०१/२०२३
२)आपले कार्यालयीन पत्र क्र./वसं(य)/कक्ष-१०/वसं/३१०५/२०२२-२३ यवतमाळ दिनांक ०२/०२/२०२३.
३)रिलायंन्स जिओ इंन्फोकॉम लि. नागपुर यांचे पत्र दिनांक ०३/०२/२०२३.

विषयांकित प्रकरणी संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये, शासनाने दि. १०/०१/२०२३ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावामध्ये त्रुटी क्र. १ ते ३ असल्याचे कळविले होते.

त्याअनुषंगाने संदर्भीय पत्र क्र. ३ अन्वये प्रकल्प यंत्रणेने त्रुटी क्र. १ ते ३ ची पुर्तता करुन त्रुटी पुर्तता अहवाल स्पष्टीकरणासह खालील प्रमाणे या कार्यालयास सादर केलेला आहे.

| अ. क्र | त्रुटी | पुर्तता |
|---|---|---|
| १ | उपवनसंरक्षक यांनी स्थळ पाहणी अहवालामध्ये सदर प्रकरणी वनभंग झाला असल्याचे नमूद केले आहे. मात्र, प्रमाणपत्रामध्ये वनभंग झाला नसल्याचे प्रमाणित केले आहे. तसेच, केंद्रस्थ अधिकारी यांनी वनभंग झाला नसल्याबाबत नमूद केले आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी वनभंग झाला आहे किंवा कसे? याबाबत अधिक स्पष्टता करावी. | उपवनसंरक्षक यांचे स्थळ पाहणी अहवालामध्ये अनावधानाने वनभंग झाले असल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु प्रत्यक्षात सदर क्षेत्राची पाहणी केली असता,सदर कामामध्ये वनभंग झालेला नाही. सोबत सुधारित भाग-२ (Part-II) व नव्याने स्थळ निरिक्षण अहवाल Site Inspection Report जोडण्यात येत आहे. |
| २ | केंद्रस्थ अधिकारी यांनी वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे नांझा येथील ०.००९ हे. जमीनीचा वैधानिक दर्जा "राखीव वने" नमूद केला असून, उपवनसंरक्षक यांनी ऑनलाईन पार्ट-२ मध्ये सदर जमिनीचा वैधानिक दर्जा "अवर्गीकृत वने (Unclassed Forests)" नमूद केला आहे. त्यामुळे सदर वनजमिनीचा वैधानिक दर्जा "राखीव वने" आहे की "अवर्गीकृत वने" (Unclassed Forests)" याबाबत माहिती सादर करावी. | मौजे नांझा गट क्र. १५६ क्षेत्र ०.००९ हे. जमीनाचा वैधानिक दर्जा हा "अवर्गीकृत वने" (Unclassed Forests)"असून, पुन्हा तपासणी केली असता सदर जमीनीचा दर्जा हा "अवर्गीकृत वने" (Unclassed Forests)" आहे. मौजे नांझा गट क्रं. १५६ ही जमीन वनसदृश्य क्षेत्र आहे. यासोबत वनसदृश्य क्षेत्राबाबतची यादी जोडण्यात येत आहे. तसेच सदर क्षेत्राचे भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४ व कलम २० अंतर्गत राखीव वन घोषीत झाले नाही. करीता सदर क्षेत्र "अवर्गीकृत वने" (Unclassed Forests)" दर्शविण्यात आलेले आहे. |
| ३ | प्रस्तावामध्ये ऑप्टीकल फायबर केबल टाकण्यासाठी मौजे देवनाळा येथील कक्ष क्र. ३७० मधील जमिन वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेली आहे. परंतु KML File चे अवलोकन केले असता, वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेले क्षेत्र मौजे, देवनाळा येथील कक्ष क्र. ३७० व ३७३ मधील असल्याचे दिसुन येते. तसेच KML File व नकाशामध्ये वळतीकरणाच्या क्षेत्राच्या Longitude-Latitude मध्ये तफावत दिसून येते. सबब, KML File व नकाशा आवश्यक त्या सुधारणेसह सादर करणे आवश्यक आहे. | प्रस्तावामध्ये ऑप्टीकल फायबर केबल टाकण्यासाठी मौजे देवनाळा येथील कक्ष क्र. ३७० मधील जमिन वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेली आहे. सदर ऑप्टीकल फायबर केबल लाईन ही फक्त कक्ष क्र. ३७० मधुनच जात आहे. त्यासंबंधी KML File मध्ये सुधारणा करुन यासोबत सादर करण्यात येत आहे. तसेच नकाशामध्ये वळतीकरणाच्या क्षेत्राचे सुधारीत Longitude- Latitude दर्शविण्यात आले आहे. |

करीता वरील प्रमाणे त्रुटी क्र. १ ते ३ चा पुर्तता अहवाल सविनय सादर.

**सहपत्र** :- वरील प्रमाणे वनसदृश्य क्षेत्राबाबतची यादी,
KML File CD, नकाशा, (Part-II) Site Inspection Report ४ प्रतीत.

**(आनंद रेड्डी येल्लु,भा.व.से.)**
**उपवनसंरक्षक**
**यवतमाळ वनविभाग यवतमाळ**

**प्रतिलिपी:-** रिलायंन्स जिओ इंन्फोकॉम लि. माऊंट रोड सदर, नागपुर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.